भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.४११/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०५/२०१७

**१) अल्पवयीन मुलाला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०५/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादीचा अल्पवयीन पुतण्या वय १३ वर्ष, याचे सोबत गावातील तळयाचे पाळीवरील आंबे तोंडण्यास गेले होते आंबे तोडुन गावांत आला परंतु पुतण्या परत आला नाही त्याचा गावात व इकडे—तिकडे शोध घेतला असता मिळुन आला नाही त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले आहे अशा फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे साकोली येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २६/०५/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगी ही घरी कोणालाही न सांगता निघुन गेली, तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुसलावुन पळवुन नेले आहे असे फिर्यादीने दिलेल्या तोंडी रिपोर्ट व शासनाचे परिपत्रकान्वये पो.स्टे वरठी येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल वरुन खाली पडल्याने डोक्याला मार लागुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २५/०५/२०१७ चे २२.३० वा. दर. यातील मृतक जिवन नामदेव कळंबे वय ५६ वर्ष, रा. राजेनद्र नगर बसस्टॉप जवळ मोहाडी हा मोटार सायकल एमएच ३६ डब्लु ६५८६ ने मोहाडी येथे जात असतांना शांती बिअर बार जवळ अचानक मोटार सायकल वरुन खाली पडल्याने त्याचे डोक्यावर, डावे कानाचे वरचे भागावर मार लागल्याने औषधोपचार करीता लक्ष हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक २६/०५/२०१७ चे ०६.३० वा. मरण पावल्याने फिर्यादी अमोल रामकृष्ण साकुरे वय ३१ वर्ष, रा. भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पो. स्टे वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुंभलकर पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल वरुन खाली पडल्याने डोक्याला मार लागुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०४/०५/२०१७ चे १५.३० वा. दर. यातील मृतक राजेश वसंत शहारे वय ३५ वर्ष, रा. नादगांव जाणी पोस्टे+ ता. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपुर हा आपले पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३४/६६३१ ने पाऊनगांव येथुन नांदगाव येथे जात असता परसोडी नाग. गावादरम्यान राज्य मार्ग क्र. ३५४ वर मोटार सायकल ही स्लीप होवुन खाली पडुन त्याचे डोक्याला मार लागल्याने त्याचा प्रथमोपचार ग्रा. रु. लाखांदुर येथे करुन पुढील उपचारास सामान्य रुग्णालय भंडारा येथे नेवुन उपचार करुन रेफर झाल्याने त्यास मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी येथे मर्ग क्र ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. वडेट्टीवार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊईके पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन जादुच्या कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन थापड बुक्याने व लाथाने मारुन जखमी करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक २५/०५/२०१७ चे २१.३० वा. दरम्यान यातील आरोपी क्रमांक १ ची मुलगी सौ. संगीता मारबते रा. गोदी पुर्न. ही १० दिवसापुर्वी मरण पावली असुन त्याकारणावरुन आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व जखमी, ठामा लाकु शेन्डे यांना तुम्ही आमचे मुलीला मारले म्हणुन भांडण करुन थापड बुक्यांनी व लाथाने मारुन फिर्यादीचे डावे पायाला फॅक्चर केले व जखमी ठामा शेन्डे यास किरकोळ जखमी केल्याने व शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी दिलीप आसाराम केवट वय ३७ वर्ष, रा. गराडा बु. यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम ३२५,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुटकुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**६) अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी . :-**

दिनांक २६/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. कारधा, सिहोरा, गोबरवाही, अडयाळ व जवाहरनगर येथे अवैध देशी दारु/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २८ लिटर हातभट्टी दारु किंमती १९५०/-रु. तसेच देशी दारु ८८२ लिटर देशी दारु + १ स्कॉर्पीओ गाडी किंमती ५,५४,८००/-रु. व जुगारातुन ९०७/-रु. असा एकुण किंमती ५,५७,६५७ /-रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-**

दिनांक २६/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०६ तीन सिटर वाहनांवरती ११ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(पोनि डी.डी. भोयर)
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र ९४२३४१८१४२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.